> अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मनाचा गुण होय.

# मृतात्म्यांचा अितिहास—३

**श्रद्धाळू शास्त्रज्ञ.** १९२० सालीं लंडन येथे या विषयावर माझा सर ए. सी. डॉअिल यांच्याशीं जाहीर वादविवाद झाला. त्यावेळीं त्यांनी माझ्या हातांत एक लहानसें पुस्तक दिलें आणि श्रोत्यांस सांगितलें कीं या पुस्तकांत मृतात्म्यांवर विश्वास ठेवणाऱ्या १६० विद्वानांचीं नांवें आहेत, आणि त्यांपैकी ४९ प्रोफेसर आहेत. अर्थात् या सर्वांचा मृतात्म्यांच्या चळवळीवर पूर्ण विश्वास आहे असें नाही, असेंही त्यांनी सांगितलें. पुस्तक उघडून पाहतां सर अे. सी. डॉअिल यांची नेहमीप्रमाणें फसवणूक झाली होती असें मला दिसून आलें. त्यांत १२६ नांवें छापलेलीं होतीं, आणि आणखी ३२ नांवें त्यांनी स्वतः हाताने लिहिलीं होतीं. त्यांपैकी फक्त २७ प्रोफेसर होते, ४९ नव्हे. कांहींना खोटेंच प्रोफेसर म्हटलें होतें आणि बाकीच्यांपैकीं बऱ्याच जणांना श्रद्धाळू म्हणणेंही खोटेंच होतें. या १५८ पैकी फक्त ५३ लोकांचे बाबतींत त्यांची श्रद्धा दाखवण्याकरतां उतारे दिले होते, पण ते उतारे बरोबर आहेत की नाहीत हें ताडून पाहतां येअील अशी कोणतीही माहिती दिली नव्हती. प्रोफेसर मोर्सेली यांनी या चळवळीला पोरकट आणि अनीतिकारक म्हटलें होतें, तरीदेखील त्यांचें नांव या यादींत होतेंच! सर अेडविन आर्नोल्ड यांनी आत्म्याच्या अविनाशित्वाविषयी अविश्वास दाखवला असतांही त्यांचें नांव होतें! सारांश, ज्यांचा खरोखर विश्वास होता असे वीस देखील विद्वान त्या यादींत नव्हते. यांतल्या लुच्चेगिरीचा आणखी एक नमुना म्हणजे लार्ड डनरॅव्हन, लॉर्ड अडार आणि अलेक्झांडर वाअिल्डर यांना जगांतील सर्वोत्कृष्ट ग्रंथकार म्हटलें होतें, पण यांचीं नांवें भाषाविषयाच्या कोणत्याही प्रोफेसराने ऐकलेलीं नाहीत.

मृतात्म्यांसंबंधी सर्व तथाकथित पुरावा तपासून आणि सर्व प्रसिद्ध मध्यस्थांची कारागिरी पाहून त्यांत किती लुच्चेगिरी आहे हें मीं यापेक्षां मोठ्या पुस्तकांत दाखवलें आहे. येथे फक्त ज्या प्रोफेसरांचीं आणि शास्त्रज्ञांचीं नांवें हे लोक आधार म्हणून पुढें करीत असतात, त्यांचाच विचार करूं. यांपैकी जे लोक बरेच म्हातारे झाले असल्यामुळे फसवण्यास सुलभ होते, त्यांचीं नांवें घेण्यांत अर्थ नाही हें उघड आहे. अमेरिकेंत या चळवळीला पाठिंबा देणारे फारसे प्रोफेसर निघाले नाहीत हें त्या देशाला भूषणावह आहे. फक्त रसायनशास्त्राचे एक प्रोफेसर मेप्स यांना बऱ्याच म्हातारपणीं लिआ फॉक्सने फसवलें होतें, पण त्यांचें नांव या लोकांनी फार दिवस घेतलें नाही, तेव्हां त्यांनी देखील यांची लुच्चेगिरी शेवटीं ओळखली असावी. त्याच विषयाचे आणखी एक प्रोफेसर हेअर हे यांत शिरले तेव्हां ७२ वर्षांचे होते आणि त्यांना फसवणारा मध्यस्थ गॉर्डन हा पुऱ्या अंधारांत हवेंत तरंगत असे! अर्थात् अंधार असल्यामुळे यांत कठिण कांहीच नव्हतें. या प्रोफेसरांना एका ११ वर्षांच्या पोराने देखील फसवलें होतें.

अितर प्रोफेसरांचीही अशीच स्थिति होती. प्रोफेसर लॅंब्रोज यांनी आपलें पुस्तक ७३ वर्षांच्या वयांत लिहिलें आणि त्यांच्या मुलीने त्यांच्या चरित्रांत लिहिलें आहे की या वेळीं त्यांची मानसिक व शारीरिक शक्ति अत्यंत क्षीण झाली होती. यामुळे त्यांनी हास्यास्पद चुका केल्या आहेत, आणि त्यांनी स्वतःचें मत असें दिलें आहे की आत्मा द्रवरूप असून अविनाशी आहे.

झोल्नर या जर्मन शास्त्रज्ञाला जेव्हां स्लेड नांवाच्या प्रसिद्ध लफंग्या मध्यस्थाने फसवलें तेव्हां ते अत्यंत म्हातारे होते अितकेंच नव्हे तर जवळ जवळ अंध झाले होते. तरीदेखील त्यांनी मृतात्म्यांचें अस्तित्व कबूल केलें नाही. तेव्हां त्यांना श्रद्धाळू शास्त्रज्ञांच्या यादींत घालणें म्हणजे लबाडी आहे. प्रोफेसर वेबर याच वेळीं फसले, त्यांना ७४ वर्षें होतीं. प्रोफेसर चॅलिस यांना वेड लागलें होतें. प्रोफेसर मेयो यांचेंही नांव हे लोक सांगतात; परंतु ते १८५२ सालींच वारले होते, आणि तेथपर्यंत हे मृतात्मे लंडनपर्यंत पोंचले नव्हते. प्रसिद्ध गणिती प्रोफे-

सर डी मॉर्गन यांनाही त्यांत घालतात, परंतु त्यांनी आपल्या पत्नीच्या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत स्पष्ट सांगितलें आहे की आपण या पंथांत शिरलों नाहीं.

डॉ. वॉलेस हे मात्र मरेपर्यंत या पंथांत होते, पण ते कधीही प्रोफेसर नव्हते. हे शास्त्रज्ञ होते हें खरें, परंतु त्यांचा विश्वास कसा बसला हें मी सांगतों. मिस निकल नांवाची एक बाअी ( हिने पुढें गपी नांवाच्या एका श्रीमंताशीं लग्न केलें ) हर्न आणि विल्यम्स यांच्या साह्याने हा फसवेगिरीचा धंदा करीत असे. १८७१ सालीं तिने एक विलक्षण गोष्ट सांगितली, ती अशी की तिला कोणीतरी तिच्या खुर्चीसह घरांतून उचलून घराच्या भिंतींतून ताशीं साठ मैलांच्या वेगाने बाहेर नेऊन तीन मैल अंतरावरच्या एका घराच्या भिंतींतून आंत नेऊन एका टेबलावर ठेवलें, आणि हें सर्व मृतात्म्यांनी केलें !' ही लफंगी बाई आणि होम यांचेमुळे वॉलेस साहेबांचा विश्वास बसला. असला मनुष्य शास्त्रज्ञ असला काय आणि नसला काय ? तो श्रद्धाळू होता हें खरें. यापासुन मृतात्म्यांच्या पुरस्कर्त्यांना कांही आधार मिळत असेल तर तो त्यांनी खुशाल घ्यावा.

सर विल्यम क्रूक्स यांचेंही नांव हे लोक घेतात. त्यांच्या लफंग्या मध्यस्थाचा विचार पुढें करूं. येथें अितकेंच सांगतों की 'लाईट' नांवाच्या याच पंथाच्या अेका पत्रांत १२ मे १९०० रोजीं अेक पत्र प्रसिद्ध झालें, तें क्रूक्स यांनी १८७४ सालीं ( होम, केटी फॉक्स व फ्लॉरेन्स कूक या मध्यस्थांबरोबर प्रयोग केल्यावर ) लिहिलेलें होतें, आणि त्यांत असें म्हटलें होतें की मृतांना जिवंत माणसांकडे संदेश पाठवतां येतात याबद्दल समाधानकारक पुरावा मला मिळाला नाही. या पत्राबद्दल क्रूक्स यांनी चकारशब्द काढला नाही. नंतर १९०५ सालीं हॅरोल्ड बेग्बी यांनी त्यांची मुलाखत घेतली, त्यांतही त्यांनी असेंच सांगितलें की मृतात्म्यांविषयी कोणताही पुरावा नाही. नंतर १९१४ सालीं मीं एका स्नेह्याकडून त्यांना विचारवलें, तेव्हांही त्यांनी आपलीं मतें बदललीं नसल्याचें सांगितलें. पण यानंतर १९१६ सालीं, ते ८६ वर्षांचे असतांना, आणि त्यांनी केलेल्या प्रयोगांना ५० वर्षें होऊन गेल्यावर, ते म्हणूं लागले की

आपला विश्वास आहे ! तेव्हां यासंबंधी जास्त लिहिण्याचें कारण दिसत नाही. त्यांचा विश्वास हा प्रयोगांचा परिणाम नसून म्हातारपणाचा होता.

सर ऑलिव्हर लॉज हे अग्रगण्य शास्त्रज्ञांपैकी नसले तरी सामान्य लोकांकरतां त्यांनी बरींच पुस्तकें लिहिलीं आहेत, आणि ते प्रोफेसरही होते, यामुळे त्यांचें नांव या बाबतींत बरेंच प्रामुख्याने पुढें येतें. तथापि परलोकवादी जें म्हणतात तें तें सर्व लॉज यांना कबूल आहे असें नाही. दोनच वर्षांपूर्वी त्यांनीं मला लिहिलें होतें की 'मी परलोकवादी नाही.' त्याचप्रमाणें त्यांनीं मृतात्म्यांच्या फोटोंच्याही विरुद्ध लिहिलें आहे. तरीदेखील त्यांनीं गेल्या ६० वर्षांत अनेक मध्यस्थांना पाठिंबा दिला आहे, आणि त्यांच्या मार्फत आपला मेलेल्या माणसांशीं संबंध आला, असें त्यांनी आपल्या ग्रंथांतून लिहिलें आहे. तसेंच आज तीस वर्षें ते म्हणत आले आहेत की मृतात्म्यांसंबंधी शास्त्रीय पुरावा आपल्याला लवकरच मिळेल. या शास्त्रज्ञावर मीं अेक वेगळें पुस्तक लिहून त्यांत त्यांच्या श्रद्धेची मीमांसा केली आहे, आणि असें दाखवलें आहे की ती सत्य घटनांवर आधारलेली नाही.

सर विल्यम बॅरेट यांचेंही नांव अेकू येतें, पण तें या लोकांनी पुढें केलें नसतें तर तें कोणालाही अेकू आलें नसतें. अमेरिकन लोक पुष्कळ वेळां पदव्यांनी फसतात. या पदव्या कधी कधी योग्य माणसांनाही मिळतात, पण कधी कधी त्या विकत घेतलेल्या असतात, आणि कधी राजकारणाकरतां दिलेल्या असतात. आयर्लंडमधें आणखी कांही पदव्यांची खैरात केली पाहिजे असें वाटलें म्हणजे त्या कोणाला तरी द्यायच्या, मग ते कोणीही असोत ! शास्त्रीय जगांत या नांवाला महत्व नाही.

फ्रान्सकडे वळलें तर प्रो. रिशे यांचें नांव हे लोक घेतात, पण त्यांनीं स्वतः याचा अिनकार केला आहे. तीच स्थिति फ्लॅमॅरिऑं या ज्योतिषशास्त्रज्ञाची होती, पण अलीकडे ते म्हातारपणामुळे बदललेले आहेत. मोर्सेली व अितर अिटॅलियन प्रोफेसर मृतात्म्यांवर विश्वास ठेवीत नाहीत, पण मध्यस्थांच्या अंगीं

गूढ शक्ति असते असें मानतात. ज्या कांहीं फ्रेंच, अिटॅलिअन व जर्मन प्रोफेसरांचीं नांवें हे लोक घेतात, ते सर ऑलिव्हर लॅाज यांच्या मतें देखील जडवादी आहेत, पण मध्यस्थांच्या गूढ शक्तीने त्यांना लांबचें सामान हलवतां येतें व अशाच कांही अितर गोष्टी करतां येतात असें ते मानतात. ही श्रद्धा मूर्खपणाचीच आहे, आणि या सर्व गोष्टींत फसवणूक असते हें पुढें दिसेल, तेव्हा त्यांचा येथे विचार करण्याचें कारण नाही.

प्रो. विल्यम जेम्स यांनाही कोणी परलोकवादी म्हणतात, पण तें खोटें. विश्वास ठेवण्याच्या तयारीने त्यांनी कित्येक प्रयोगांचा अभ्यास केला हें खरें, पण त्यांची कधींही खात्री झाली नाही. मरणापूर्वी दोन वर्षें त्यांनी अमरत्वावर एका व्याख्यानांत आपला अविश्वास स्पष्ट केला होता. प्रो. हिस्लॉप हे 'अमेरिकन सोसायटी फॉर सायकिकल रिसर्च' या संस्थेचे चिटणीस होते, पण त्यांना शास्त्रज्ञ म्हणतां येणार नाही. त्यांचा विषय तत्वज्ञान होता. त्यांच्या पूर्वीचे चिटणीस डॉ. हॉजसन हेही शास्त्रज्ञ नव्हते, आणि मृतात्म्यांसंबंधी बहुतेक प्रयोगांत लबाडी असते असें त्यांचें मत होतें.

तेव्हां हे लोक जीं शास्त्रज्ञांचीं म्हणून नांवें पुढें करतात, त्यांतलें एकच नांव शिल्लक राहतें, सर ऑलिव्हर लॉज. आणखी पांचसहा लोकांचा ज्या मध्यस्थांमुळे विश्वास बसला, ते लफंगे होते असें पुढें सिद्ध झालें, तेव्हा ते जमेंत धरतां नये. कांही डॉक्टर होते, त्यांना शास्त्रज्ञ म्हणतां येणार नाही. क्रॉफर्ड हेंही नांव ऐकूं येतें, पण हे गृहस्थ शिक्षक होते, प्रोफेसर नव्हते, आणि आपणास एका मध्यस्थाने चार वर्षेंपर्यंत फसवलें हें जेव्हां त्यांच्या लक्षांत आलें, तेव्हां त्यांनी जीव दिला (१९२०). यासंबंधी छापलेल्या हकीकती पुष्कळ वेळां खोट्या असतात, आणि या बाबतींत अमेरिकेअितकीच लबाडी अिकडेही (इंग्लंडांत) सांपडते. (अपूर्ण)

---

# महाराष्ट्राचा आजचा जळता सामाजिक प्रश्न

लेखक, भास्करराव जाधव

सवत्सपत्नी ह्यात असतां दुसरी सुशिक्षित वधू घरीं आणण्यांचे प्रसंग अलीकडे बरेच घडून येऊं लागले आहेत. वर्तमानपत्रांतून या प्रकारावर कडक टीका होत आहेत. सुशिक्षित म्हणवणाऱ्या बायकांच्या सभा होऊन अशा वरांचा निषेध होत आहे. पुरुषांमध्यें मात्र याविषयी फारशी हालचाल नाही. वर्तमानपत्रांत लेख लिहून आपला संताप व्यक्त करण्यापलीकडे त्यांची मजल गेलेली नाही. ( पुण्यांत हर्षे–पानसे विवाहाचा निषेध करण्याकरतां नुकतीच भरलेली सभा बायकांची नव्हती. **सं.** ) या उलट द्विभार्यांक काढून **समाजस्वास्थ्याने** दुसरी बाजू मांडली आहे.

लग्नाच्या कामीं वर व वधू अशीं दोन पात्रें लागतात व या निषिद्ध विवाहांत वधू ही प्रौढ व सुशिक्षित असते. यामुळे ती वराअितकीच दोषी असतांही निषेधाच्या लेखांत व सभांत सगळी झोड पुरुषांवर पडते. स्त्री ही अगदीच विसरली जाते, किंवा चारदोन वाक्यांनी तिची केलेली संभावना टीकाकारांना पुरेशी वाटते. हें कदाचित् त्यांच्या स्त्रीदाक्षिण्यामुळे होत असेल.

हिंदु पुरुषाला एककाळीं एकाहून अधिक भार्या करण्याची धर्माने परवानगी आहे. स्त्रीला मात्र अनेक पतींची मनाअी आहे. ही विषमता कायद्याने दूर करावी अशी मागणी-विशेषतः स्त्रियांकडून-जोराने करण्यांत येत आहे. विशिष्टविवाहाच्या कायद्याप्रमाणें एक पति किंवा पत्नी ह्यात असतां दुसरा पति किंवा पत्नी करणें हा गुन्हा ठरला आहे. त्याचप्रमाणें हिंदु विवाहसंस्कार झाल्यावरही वराने पहिल्या पत्नीच्या ह्यातींत कोणत्याही सबबीवर दुसरी पत्नी करणें हा गुन्हा ठरवावा, अशी मागणी जोरांत आहे व कदाचित् असा कायदा पुढेंमागें मंजूरही होईल.

यूरोप खंडांत तेथील ख्रिस्ती धर्मामुळें अकपत्नीव्रत पाळण्याची सक्ती पुरुषांवर आहे. पण तेथेही अेकपत्नीव्रत पाळणारे किती प्रमाणांत मिळतात ?

विवाहबाह्य संबंधास मात्र अशा निर्बंधाने उत्तेजन मिळतें. दोन सवती अेकत्र रहात नाहीत अितकेंच.

आज सर्वत्र निषेध केलेलीं लग्नें महाराष्ट्रांत सुशिशित वधूवरांत लागत आहेत. ही स्थिती कितीही शोचनीय असली तरी ती अपरिहार्य आहे असें दिसतें. गुजराथमध्यें किंवा उत्तर हिंदुस्थानांत अशा द्विभार्याविवाहाचीं उदाहरणें फारशीं होत नसावींत, किंवा त्यांचा निषेध करण्याअितकें महत्व त्यांस देणें त्या त्या समाजास अिष्ट वाटत नसावें. आमच्या महाराष्ट्रांत मात्र असें उदाहरण घडल्याबरोबर वर्तमानपत्रांतून व सभांतून निषेधाची झोड उडते व नंतर हे सगळे वाग्विीर व लेखणीबहाद्दर दुसरें तसलें लग्न लागेपर्यंत गप राहतात.

असल्या आक्षेपित विवाहांच्या पार्श्वभूमीचा थोडा विचार करूं. अलीकडच्या काळीं समाजांत—विशेषतः पुढारलेल्या वर्गांत—मुलांच्या बरोबरीने मुलींचें शिक्षण अवश्य झालें आहे व बहुधा दोघांसही अेकच प्रकारचें शिक्षण मिळतें. त्याच परीक्षा द्याव्या लागतात व पदव्या मिळतात. अशिक्षित मुलींना शिकलेले मुलगे पसंत करीत नसल्यानें मुलींना शाळेंत घालावेंच लागतें. महाराष्ट्रांत तरी मुलीचें लग्न तिच्या सोळाव्या वर्षांपूर्वीं होणें कठीणच पडतें. तेथपर्यंत शिक्षण सुरूच असतें. लग्न लवकर जमलें नाही तर—व गरीब बापाच्या मुलीचें लवकर जमणें कठीणच—ती मुलगी शिक्षण घेत राहते. अशा प्रकारें वीस वर्षांचें वय झालें व मुलगी कॉलेजच्या एकदोन परीक्षा पास झाली असली, म्हणजे मुलीला ग्रॅजुएट होण्याची ईर्ष्या येते. बी. ए. झाल्यावर घरची गरीबी असेल व धाकट्या भावांचें शिक्षण व्हायचें असेल, तर तिला कोठेतरी नोकरी करून बापाच्या उत्पन्नांत भर टाकणें भाग पडतें. अशा रीतीनें पंचविशीच्या पलीकडे गेल्यावर तिला अनुरूप वर मिळवून देणें बापास शक्य रहात नाही. अशा प्रसंगीं लग्नाचा विषय सोडून तरी द्यावा, किंवा आपणच त्याची तजवीज करावी असा प्रसंग तिजवर येतो.

त्यांच्या वयाचे किंवा त्यांच्यापेक्षां ४—५ वर्षांनी मोठे असे सुविद्य तरुण विवाहबद्ध होऊन आपला संसार चालवीत असतात. कमी शिकलेल्या किंवा न

मिळवत्या बरोबरीबर विवाह करणें यांना पसंत न पडणें योग्यच. पंचवीस तीस वर्षें मन मारलें तरी कामवासना कायमची मारणें फारच थोड्यांना शक्य असतें. शिवाय मातृत्वाची अिच्छा हीही उचल खाते. या कारणांनी अशा मुली विवाहास उत्सुक होतात. या मुली कोठेतरी नोकरी करून आपल्या पायावर उभ्या असतात, बहुधा त्या स्वतंत्र असतात, समानविद्य व समान दर्जाच्या पुरुषसमाजांत त्यांचें जाणें येणें असतें. अशा रीतीने अेकत्र आलेल्या समानशील स्त्रीपुरुषांत परस्पर आकर्षण व पुढें प्रेम यांचा उद्भव न झाल्यासच आश्चर्य. शिवाय सर्वच विद्वान व कर्त्या पुरुषांच्या बायका आपल्या पतीला अनुरूप असतात असें नाही. घरचा प्रपंच सुतंत्र चालू असला व मुलेंबाळें झालीं असलीं तरी पति-पत्नींचें मन मिळालेलें असतें असें नाही. आपल्या जीवनांत कांहीतरी कमताअी आहे याची जाणीव पुरुषाला बोंचत असेल व ती कमताअी भरून काढणारी स्त्री त्याच्या परिचयाची होअील तर तिच्याविषयी आकर्षण वाटणें व त्याचें पर्यवसान प्रेमांत होणें हें स्वभावास सोडून नाहीं. अशा सपत्नीकांस दुसऱ्या विवाहाची परवानगी त्यांच्या धर्माने दिली असल्याने हीं स्त्रीपुरुषें राजरोसपणें पुढें येतात व लोकांच्या टीकेचा आघात सोसण्याचें धैर्य दाखवतात. कायद्याने हा उघड विवाहाचा मार्ग बंद झाल्यास विवाहबाह्य संबंधास मात्र उत्तेजन मिळेल. पण वर्तमानपत्री टीका व निषेधाच्या सभा बंद पडतील.

पहिल्या स्त्रीच्या–आपल्या भगिनीच्या–संसारावर निखारे ठेवणारी, असा आरोप या नवसवतीवर केला जातो. वास्तविक पाहतां हा आरोप वृथा आहे. पहिल्या बायकोविषयी मन विटल्यावर, म्हणजे तिच्या संसाराचें मातेरें झाल्या-वरच तिचा नवरा दुसऱ्या विवाहास तयार होतो, ही गोष्ट बहुधा नजरेआड होते असें दिसतें.

अशा प्रकारचे विवाह स्पृहणीय आहेत असें कोणीही म्हणणार नाही. हे कसे बंद व्हावे याचा विचार निषेध करणारे करणार नाहींत. पण यावर उपाय काय याचा विचार आपले वाचक करून आपली योजना **समाजस्वास्थ्य**-द्वारें समाजापुढे मांडतील अशी आशा करून लेख पुरा करतों.

# उच्च संस्कृति

लेखक, स० हृदय बी. ए., महाड.

कांही कुटुंबांत पुरुष कमवता असला तरी त्याची पत्नी घरांत मुख्य भूमिका स्वीकारते. त्यांत पुरुषाची अक्कलहुशारी घरांत चालत नाही असेंच नेहमी नसतें, पण 'ती' करते आहे ना सर्व कांही? आपल्याला कशाला हवी नसती उठाठेव? अशी उपेक्षेची वृत्ति दिसून येते. अशांत मोडणारें धनंजयांचें कुटुंब होतें.

धनंजय–जयाबाओी यांना एकून अकरा मुलें झालीं. 'ईश्वरकृपेने' त्यांतील पांच जिवंत असून त्यांच्या घरांतील संपत्ति भूषवीत होतीं. जयाबाओी आतां चाळिशी उलटून गेल्या होत्या. त्यांच्या धाकट्या मुलीचें, भद्राचें, लग्न त्यांनी ठरवलें होतें. खरी गोष्ट अशी होती की कु. भद्रानेच आपला कॉलेजांतील प्रियकर निवडला होता. तो आतां एम्. एस्‌सी. होऊन लढाओीवर कोठल्यातरी भागावर नोकरीनिमित्ताने जाणार होता. म्हणून लवकर लग्न उरकून घ्यायचें त्याचें सारखें टुमणें लागलें होतें. अर्थात् आतां तो चांगला कमवता झाल्यामुळे जयाबाओींना अडचण आणतां येओीना. त्यांनी तिथिसुद्धां निश्चित करून टाकली आणि म्हणून धनंजयांशिवाय घरांतील सर्व मंडळीची धांवपळ चालली होती.

अलीकडे जयाबाओींना बरें वाटत नसल्याची तक्रार त्या सारखी करीत होत्या. याही गोष्टीकडे धनंजयांनीं कौतुकानें पाहिलें व त्यांना घरडॉक्टरांकडे जाण्याचा आग्रहाचा सल्ला दिला. पण भद्राच्या लग्नाच्या भानगडीमुळें जयाबाओींना डाक्टरांची भेट घेण्यास फावलें नव्हतें.

जयाबाओींना सर्वांत धाकटा शशि नांवाचा मुलगा होता. त्याने त्या धामधुमींत ओक पुस्तक जयाबाओींच्या हातीं आणून दिलें. 'आओी, आओी, हें बघ काय तें! कशीं छान चित्रें आहेत!'

जयाबाओींनी तें पुस्तक पाहिलें. त्यांचा चेहरा रागानें लालबुंद झाला.

त्यांनी तें आपल्या कपाटांत ठेवून दिलें. 'काय रे शशि, तुला कुठे मिळालें हें, गाढवा ?'

—माओीने जातां जातां आपल्या गादीखाली सारून दडवून ठेवतांना मी पाहिलें, नि ती गेल्यावर काढून त्यांतलीं चित्रें पाहिलीं. मला आवडलीं तीं.

—तूं पाहिलींस हीं चित्रें ?....कारटे मेले !—असें म्हणून जयाबाओींनीं त्याच्या पाठीवर दोन रट्टे ठेवून दिले. बिचारा शशि रडत रडत दूर गेला.

सायंकाळीं साडेसहाच्या सुमारास भद्रा आणि तिचा प्रियकर हेमंत अशीं दोघेंजणें हंसत हंसत घरांत शिरलीं. जयाबाओींचा अवतार पाहून तीं दोघें जरा थबकलीं. पण 'असेल कांहीतरी. आपल्याला काय करायचंय् ?' अशा विचाराने भद्रा आपल्याबरोबर आणलेलीं चार पातळें दाखवण्यासाठीं 'आओी, आओी,' करीत जयाबाओींकडे नेली.

—मोठी आली आहे आओीची मुलगी, 'आओी आओी' करायला. हें बघ काय तें ?–असें म्हणून मोठ्या आवेशाने कपाटांतील 'संततिनियमन' हें पुस्तक काढून भद्रापुढें फेकलें. तें पाहतांच भद्राच्या हातांतील चारही रेशमी पातळें गळून पडलीं. ती मटकन् जवळच्या कोचावर बसली.

हेमंत तिच्याजवळ गेला. त्याने तिच्या केसांवर हात फिरवीत 'काय झालें भद्रा ?' असें प्रेमळपणाने विचारलें.

—काय झालें तें...तें पहा !–जयाबाओी फणकाऱ्याने उद्गारल्या.

हेमंताने तें पुस्तक उचलून घेतलें, पाहिलें. 'काय आहे त्यांत विशेष ?'

—म्हणजे ? तुम्हाला त्यांत कांहीच वाटत नाही ?–जयाबाओी कमालीच्या विस्मयाने बोलल्या.

—कांही वाटण्याचें कारण ?

—नि हें तुम्ही माझ्या सरळ मनाच्या भद्राच्या मनांत भरवणार. तिला नाही नाही तें निसर्गविरुद्ध वागण्यास शिकवणार. देवाधर्माची अवहेलना करण्यास तिला शिकवणार तुम्ही ! मला हें चालायचें नाही, सांगून ठेवतें हेमंतराव तुम्हाला.—जयाबाओी ठासून गुरगुरत होत्या.

—भद्रा लग्नानंतर माझी होणार आहे. तिनें कसें वागावें नि काय करावें हा माझा प्रश्न आहे.—तितक्याच ठांशीव स्वरांत हेमंत बोलला.

—मी नाही समजलें.

—त्यांत समजण्यासारखें विशेष कांही नाही. मीच तें पुस्तक तिला वाचण्यास दिलें. म्हटलें लग्नापूर्वी तिला सर्व कल्पना असावी.

—शरम वाटायला पाहिजे हेमंतराव तुम्हाला माझ्यासमोर अशा गोष्टी बोलायला. आमचें घराणें, कुलीनत्व, आमचे उच्च संस्कार, आमचा सनातनी धर्म, वगैरेंचा विचार करूनच तुम्ही भद्राची निवड केली असाल असें मी समजलें होतें.

—थांबा जरा. आपली तशी समजूत असेल तर चुकीची आहे. तिची मी निवड केली ती तिचें सौंदर्य, हुशारी आणि शरीरसौष्ठव, गौरवर्ण, पाहून केली. आपण म्हणतां त्या गोष्टींकडे मला पाहण्याची जरूरी वाटली नाही.—सावकाशपणें उत्तर देतांना हेमंताने आपली सिगारेट पेटवली.

—म्हणजे माझी मुलगी तुम्ही समजतां तरी कोण ?

‘ आओ, आओ ’ असें अर्धवट ओरडत भद्राने आपलें तोंड झांकून घेतलें.

—अेक सुंदर तरुण आकर्षक स्त्री, आणि ती माझ्या अेकट्याचीच रहावी म्हणून मी तिच्याशीं लग्न करायला तयार आहें.

—काय बोलतां तुम्ही हें ? तुम्हाला समजतें तरी का की तुम्ही जें बोलतां आहां त्याला मुळीं सुद्धां अर्थ नाही हें ?

—माझी विचारशक्ति अजून शाबूत आहे.

—म्हणजे आमची गेली आहे असें तुम्हाला म्हणायचें आहे ?—तीव्रतेने जयाबाओंनी विचारलें.

—मी तसें म्हटलें नाही—शांत हेमंत उद्गारला.

—म्हणायला कशाला पाहिजे ? संस्कार, धर्म, कुलीनपणा, यांच्याकडे पहायची तुम्हाला जरूरी वाटत नाही. लग्नापूर्वी भद्राला तुम्हीं भलभलतीं चित्रें दाखवून तिचें पवित्र मन गढूळ करून टाकीत आहां, आणि मुलें व्हायच्या आधीं

तुम्ही मुलें नकोत म्हणून देवाविरुद्ध बंड करीत आहां. पण मी पूर्ण विश्वासानें सांगतें कीं मुलें व्हायचीं न व्हायचीं हें तुमच्या किंवा या तुमच्या कर्व्यांच्या खटपटीवर मुळीच अवलंबून नाहीं. तें सर्व देवाच्या हातीं आहे. मला अितकीं मुलें झालीं, पण माझ्या मनांत असले घाणेरडे विचार आले नाहीत.

—समजलों मी. तुमच्या त्या देवाला कर्व्यांनी पंचवीस वर्षांपूर्वी आह्वान दिलंय्. आज मी देऊन पहाणार आहें.

—मूर्ख आहां तुम्हीं ! लग्न व्हायच्या पूर्वीं तुम्ही अशा गोष्टी बोलतां. भद्राच्या बाबतींत मला जास्त विचार करायला हवा.

—आअी, आअी ! किती तूं ही... ही आहेस ? माझ्या सुखाच्या आड येतेस ?–भद्रा आतां मात्र जरा चढत्या स्वरांत बोलली.

—भद्रा जातों मी. घरांत डझनभर मुलें खेळत असलीं म्हणजे खरें सुख, अशी यांची कल्पना आहे. करूंदे त्यांना विचार. मी जातों.—हेमंतनें आपली टोपी चढवली, टाय नीटनेटका केला नि तो जिन्याकडे चालूं लागला.

—हेम, हेम, माझ्या प्रेमासाठी तरी.—भद्राने त्याला अडवलें.

—तुझ्या आईकडे पहा अगोदर !

भद्राने खरेंच तिच्याकडे पाहिलें, तों जयाबाअींचा तो उग्र नि भकास चेहरा पाहून भद्रा दचकली. तिची मान खालीं झाली. हेमंत निघून गेला.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच हेमंत आला. तें कळूनही जयाबाअी बाहेर आल्या नाहीत. भद्रा मात्र आली. तिचा तो उदास चेहरा पाहून हेमंत कळवळला. ‘ जरा हंस पाहूं भद्रा !’

—तूं आलास ? आनंद वाटला. मला वाटलें तूं आअीवरून रागावलास नि मला...

—नाही, तूं माझी आहेस. आहेस ना ?

—नाही वाटतें ?—भद्रा हंसत बोलली,

—मग जरा आतां माझ्याबरोबर बाहेर चलतेस ?

—चल ना !–भद्रा तशीच हेमंताबरोबर बाहेर निघून गेली.

## उच्च संस्कृति

हेमंताने तिला काळबादेवीच्या जवाहर साडी स्टोअर्समध्यें नेलें, त्याने एक उत्तमशी साडी खरेदी केली. तडक तो ठाकुरद्वारला आला आणि मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या गल्लींत शिरला.

—आतां कसलें पुस्तक वाचायला देणार आहेस तूं?

—दाखवितों चल.

तीं दोघेंजणें सरळ सुंदरराव वैद्यांच्या घरांत शिरलीं. तेथे हेमंताची मित्रमंडळी आणि बहिणी वगैरे वाट पहात उभ्या होत्या. सुंदररावांनी सर्व तयारी केलीच होती.

—तुझ्याशीं लग्न लावायला येथे आणलंय मी तुला. आंत हो, हें पातळ बदल. पळ.

—पण आई?

—तिच्या संस्कारांविषयी तिला उच्च विचार सुचताहेत, ते अजून संपले नाहीत. चल ना!–असें म्हणत हेमंताने सर्वांदेखत तिचें चुंबन घेतलें. ती लाजली आणि चटकन् आंत गेली.

—काय हें दादा? अरे लग्नाआधींच?–त्याची एक बहिण म्हणाली.

—नाही, फक्त वीसपंचवीस मिनिटें अगोदर.—हेमंताबरोबर सर्वजण हंसले.

अशा रीतीने अचानकपणें भद्राचें लग्न झालेलें पाहून आणि विशेषतः आपली सर्व तयारी वाया गेलेली पाहून जयाबाईंना जबर धक्का बसला. त्या आजारी पडल्या. घरडाक्टरांना बोलावण्यांत आलें.

त्यांनी जयाबाईंची प्रकृति नीट तपासली. जरा मज्जातंतूंवर ताण पडल्याचें त्यांनी सांगितलें. 'विश्रांति घेतली म्हणजे बरें वाटेल' असें पण म्हणाले. पण त्यांचा जरासा गंभीर चेहरा पाहून धनंजय बुचकळ्यांत पडले. ते डॉक्टरांबरोबर बाहेर आले.

—मला आनंद वाटतोय धनंजय. जयाबाईंना चार एक महिने गेले असावेत.–मुद्दाम हंसरा चेहरा करीत डाक्टर उद्गारले.

—असें का ?—आतां हंसावें की रडावें हें धनंजयना कळेना. कारण तें सर्व कांही ठरवण्याचें काम त्यांच्या पत्नीच्या हातीं होतें. शेवटीं विचार करून तिला खास आनंद वाटेल असें ठरवून ते आपल्या खोलींत शिरले.

—काय म्हणाले डॉक्टर ?

—कांही विशेष नाही, आतां आपल्याला चार पांच महिन्यांनी होणाऱ्या मुलाचें नांव काय ठेवायाचें याचा विचार करायला हवा.—अगदी उच्च दर्जाचा विनोद आपण करीत आहोंत असें जाणून धनंजय बोलले.

जयाबाअींना आश्चर्याचा फक्का बसला. त्यांचे ते विस्फारलेले नेत्र पाहून धनंजय चकित झाले. 'जया, जया...असें काय करतेस ?' धनंजयाचें हे प्रेमळ उद्गार अेकतांच आपल्या अंगावर असलेला रग पूर्णपणें ओढून घेऊन आपलें सर्व शरीर झांकून जयाबाअी निजल्या. धनंजय तेथे मुकाट बसून राहिले, थोड्या वेळांत रगच्या आंतून दाबलेले हुंदके बाहेर पडूं लागलेले पाहतांच धनंजय चोरट्या पावलांनी निघून गेले.

पण करतां काय ? ती त्यांची पत्नी होती. पंधरा मिनिटांनी ते परत आंत आले. जयाबाअी आपल्या तोंडावरील पांघरूण काढून जोराजोराने उच्छ्वास सोडीत होत्या. 'आपल्या शोभेला झालेलीं मुलें मी सांभाळावयाचीं... भद्राला होणारीं मुलें, आपलीं नातवंडें आपण खेळवीत बसायचें,...तों...काय मी करूं ? माझी बेअब्रू झाली. सारे टिंगल करतील आपली. आपले संस्कार, आपलें घराणें, हाय ! मी कसें सहन करूं हें दुःख ?' जयाबाअींच्या डोळ्यांतून अश्रू येत होते.

—हें काय असें बरें ? सर्व देवाधीन गोष्टी आहेत.—धनंजय खरोखरच सरळपणें सद्भावनेनें बोलले.

—डोंबल तुमचें ! कांहीं समजतंय् तरी का अिकडे ? म्हणे देवाधीन गोष्टी ! तुम्ही...तुम्ही कारण आहांत या माझ्या फजीतीला. मला बाहेर तोंड काढायला जागा नाही उरली, आणि आतां वर मोठें तत्वज्ञान सांगताहेत.

—मी ? मी कसा काय ?

—कधीं माझें ऐकाल तर शपथ!

—अरे पण!...त्या दिवशीं तूंच मला...आठवतें? चारपांच महिन्यांपूर्वी आपण 'यू बिलाँग टु मी' हा सिनेमा पाहिला. त्यांतील बार्बाराचें ॲक्टिंग पाहून तूं खुष झालीस. आणि त्या रात्रीं तूं तसेंच ॲक्टिंग करायला लागलीस. मी काय करणार? मला फोंडाचें काम करावें लागलें. केवळ तुझ्या अिच्छेसाठी म्हणून...मी चुकलों, कबूल आहे, मी चुकलों.

—अिश्श! बोलवतें तरी कसें हें सारें तुम्हाला? कोणी ऐकलें तर? कांही लाजलज्जा तरी!

—कोणी नाही येथे.—सभोंवार पहात धनंजय हलकेच बोलले.

—म्हणून काय झालें? नाही त्या गोष्टी तोंडाने बोलणें शोभतें तरी का अिकडे?

—बरंय, चुकलों आम्ही.

चारपांच दिवसांनंतरची गोष्ट. जयाबाअी अंथरुणावर पडल्या होत्या. धनंजय सोफ्यावर रेलून बसले होते.

—म्हटलें कांही दयामाया तरी आहे का जिकडे? भद्राचा नवरा पुढल्या आठवड्यांत युद्धाच्या आघाडीवर जाअील. त्यांना घरीं रहायला तरी बोलवा आठदहा दिवस.

—पण मी कधी नाही म्हटलें?

\+ + + +

भद्रा हेमंतासह आली होती. धनंजय आपल्या खोलींत बसले होते.

—हें वाचा, नि योग्य तें...काय करायचें तें करून टाका.—धनंजयच्या गळ्यांत हात घालीत त्यांच्याजवळ लाडिकपणाने बसून जयाबाअी बोलल्या.

'संततिनियमन!' त्या पुस्तकाकडे पाहतांच धनंजयला धक्का बसला.

—किती तुम्ही मागें आहांत जगाच्या?—जयाबाअी काय बोलल्या हें धनंजयांना कळलें नाही.—भद्रा—हेमंत कशीं फुलपांखरांसारखीं आनंदी आहेत तें बघाना जरा!

—बघतोंय मी तें.

—असें काय करायचें तें ?—असें म्हणत जयाबाईंनी त्यांच्या गालावर कसलासा आवाज केला. भेदरलेले धनंजय आपला ओलसर गाल पुशीत बाजूला झाले.

---

# स्त्रिया आणि नग्नता

लज्जा किंवा विनय हा स्त्रियांचा अेक नैसर्गिक गुण आहे अशी पारंपरिक कल्पना आहे, परंतु तो त्यांचा नैसर्गिक गुण नसून लहानपणापासून मोठ्या प्रयत्नाने त्यांना हा गुण शिकवावा लागतो, हें कोणाही निरीक्षकाला सहज दिसतें.

नग्नतेच्या बाबतींत न्यू यॉर्क येथील ‘ट्रुथ सीकर’ नामक मासिकाचे अेक माजी संपादक जी. अी. मॅकडोनल्ड हे गेल्या (१९४२) आगस्टच्या अंकांत लिहितात, “या शतकाच्या पहिल्या दशकांत जो धरणीकंप झाला, त्यापूर्वी वीस वर्षांपासून सॅन फ्रान्सिस्को येथे अेक ‘ॲडॅमाअिट’ नांवाचा पंथ होता, असें त्याची सभासद असलेल्या अेका विनयशील महिलेकडून मला कळलें आहे. नंतर केसर विल्हेल्मच्या कारकीर्दींत ही चळवळ जर्मनींत पसरली, व तेथील एक गृहस्थ मला त्यासंबंधी पुस्तकें, वृत्तपत्रें, वगैरे पाठवीत असत. गेल्या महायुद्धांतनंतर न्यू यॉर्कमधें कांही नग्नसंघ निघाले. बारा वर्षांपूर्वी मला डेव्हिड रूबन नामक अेका पुढारलेल्या कार्यकर्त्याने अशा संघांतल्या अेका सभासद स्त्रीविषयी पुढील हकीकत सांगितली होती. अेके रविवारीं शहरांतील कांही मंडळीबरोबर तो फिरायला गेला असतां त्याला ही बाअी भेटली. बाकीची मंडळी आसपास नव्हती, आणि तिच्या सूचनेवरून तीं दोघें हडसन् नदीच्या कांठाला गेलीं. तेथें त्यावेळीं कोणीही नव्हतें असें पाहून ती बाअी म्हणाली, ‘आपण येथे स्नान करूं या.’ (नदींत स्नान म्हणजे सर्व कपडे काढून ठेवून करायचें असतें, हें कदाचित् हिंदुस्थानांतल्या लोकांच्या

लक्षांत यायचें नाही, पण यूरोपअमेरिकेंत अशीच पद्धत आहे. सं. ) डेव्हिड्‌ला तें चमत्कारिक वाटलें आणि तो तयार झाला नाही. तो अेका खडकामागे जाऊन दिसणार नाही अशा ठिकाणीं बसला, आणि ती बाअी दुसऱ्या अेका खडकावर कपडे काढून ठेवून नदींत उतरली. डेव्हिड आपल्या आअीपासून कधी फारसा दूर गेलेला नसल्यामुळे ही गोष्ट मला सांगतांना देखील त्याला कसेंसेंच वाटत होतें." अेकत्र नग्न स्नान करण्याची त्याला लाज वाटली यांत नवल नाही, पण त्या बाअीला त्यांत कांहींच वाटलें नाही, आणि तो कबूल न झाल्या-बद्दल तिची निराशाच झाली असली पाहिजे. लाज वाटली ती त्याला. अेकत्र स्नान करायलाच नव्हे, तर नुसतें पहायला सुद्धां ! अेकंदरींत स्वाभाविक लाज पुरुषांनाच जास्त वाटते, स्त्रियांना ती शिकवावी लागते.

ते आणखी पुढें लिहितात, "अशा प्रकारच्या चळवळींत स्त्रियाच अधिक कळकळीने सामील होतात आणि त्या निष्कारण लाजतही नाहीत. न्यू यॉर्कच्या 'सिटी काऊन्सिल'मध्यें पुरेसे कपडे न घालणाऱ्या लोकांसंबंधी विचार चालला होता, आणि समुद्रकांठापासून दोनशें फुटांपेक्षां जास्त अंतरावर कोणी पुरेसे कपडे न घातलेला दिसेल तर त्याला शिक्षा करावी की काय, असा प्रश्न निघाला असतां अेका स्त्रीनें मत दिलें की कपडे तपासण्यापेक्षां अधिक महत्वाचीं कोण-तींही कामें पोलिसला आतां शिल्लक राहिलीं नाहींत, असें होईपर्यंत या प्रश्नाचा विचार तहकूब करावा !

"ॲगाथा क्रिस्ती या प्रसिद्ध लेखिकेनें अेका पात्राच्या तोंडांत असें वाक्य घातलें आहे की कामविषयक वेड आणि धार्मिक वेड यांचें मूळ एकच आहे. रॉबर्टा कीरमन नांवाच्या लेखिकेनें 'नग्नतेच्या पुरस्कर्त्यांचें 'प्रेम' अशा मथळ्याचा अेक लेख 'ओपन रोड' नांवाच्या मासिकाकडे पाठवून त्याबरोबर उदाहरणार्थ स्वतःचें एक छायाचित्र पाठवलें. यावरून स्त्रियांना नैसर्गिक लज्जा कितपत असते हें स्पष्ट होईल. अर्थात् अशा चित्रांबाबत अिंग्लंडांत व अमेरिकेंत खटलेही होतात, परंतु समंजस न्यायाधीश आणि टीकाकार त्यांना निर्दोषच ठरवतात."

# पत्रव्यवहार

१

**बहिणींची धोंड.** ×× पुरांत एका अविभक्त कुटुंबांत कामानिमित्त जावें लागलें. सदर मंडळी ना नव्या ना जुन्या वळणाची. चौघे बंधु व सर्वांचा समाधानकारक परिवार, परंतु कन्यांचीच भरती अधिक. जुन्या मताप्रमाणें वयाचे क्रमानुसार सर्व मुलींचीं लग्नें करण्याचा त्यांचा मानस. मुली तरी हुशार असतील? अं हं! दिसायला सुंदर असाव्या, तर तेंही नाही. मग त्यांचे विवाह झटझट व्हावे कसे?

सर्वांत वडील मुलगा वसंत. बाकी मुलगे अद्याप फारच लहान. वसंत बी. ए., वडिलांचा एकुलता एक ( धूर्त लोकांची वांटणीनंतरची दृष्टि ), दिसायलाही चांगला. त्याला वरचेवर मुली सांगून येऊं लागल्या ही गोष्ट त्यासही समजली. परंतु प्रत्येक वेळीं मुलींचे लग्नाचे निमित्ताने सर्वांस नकार मिळे. एका सद्गृहस्थांनी त्याला समक्षच विचारलें. गरजवंताला अक्कल नसते म्हणतात! वसंताचे डोक्यांत विचार थैमान करूं लागले.

—काका, आम्हाला संन्यासाश्रमांतच प्रवेश करावा लागणारसें दिसतें, फराळ संपून मंडळी उठून गेल्यावर वसंत उद्गारला.

वसंताचा मामा श्रीमंत आणि अट्टल बाहेरख्याली, आणि वसंताला लहानपणापासून सिनेमा-दृश्यें, नाटक-कादंबऱ्या, लघुकथा, प्रेमकथा यांचा सुकाळ. शिवाय मातुलगृहीं कामविषयक चर्चा-विनोद वगैरे, वगैरे वातावरणांत वाढलेला. तशांत पंचविशीच्या वयांत विवाह दुरावतो आहे असें लक्षांत येतांच त्याचे तोंडांतून वरील उद्गार निघाले तर चूक कोणाची? वडील मंडळीचें दुर्लक्ष झालें नि अखेर मामाचे वळणावर जाऊं लागला तर? पैसा, शरीर आणि अब्रूचे बचावाचे मार्गांत या सर्व बहिणी म्हणजे धोंडच नाही तर काय?

आपला, **पंढरपूरकर.**

उ. बहिणींच्या आणि भावांच्या लग्नाचा संबंध असण्याचें कारण नाही, आणि मुलीचें लग्न झालेंच पाहिजे हा दंडकही आतां फेकून देण्याची वेळ आली आहे. विशेषतः ज्यांचीं लग्नें सहज होणें शक्य नाही, अशा मुली हल्ली पुरेसें शिक्षण घेऊन आपलें पोट स्वतः भरण्याच्या मार्गाला लागतात आणि तेंच रास्त आहे. लग्न हा पोटाचा धंदा समजण्याचे दिवस आतां गेले. **सं.**

२

**काय हवें, मुलगा कीं मुलगी?** जननशास्त्रांतील तज्ञ समजल्या जाणाऱ्या लोकांची अशी अेक कल्पना आहे की मुलगा अथवा मुलगी होणें याचा संबंध योनिमार्गांतील संभोगकालीन आम्लतेवर बराच अवलंबून आहे. आम्लतेचें प्रमाण कमी असेल तर बहुतेक मुलगे होतात आणि जास्त असेल तर बहुतेक मुली होतात व आम्लता फारच असेल तर संतति होत नाहीं. मासिक पाळीनंतर लवकरच संभोग झाल्यास होणाऱ्या अपत्यांत मुली जास्त, कारण या वेळीं योनिमार्गांतील स्राव अधिक प्रमाणांत येत असून त्यामुळें आम्लतेचें प्रमाण वाढतें, त्याचप्रमाणें प्रथम अपत्यांत मुलींचें प्रमाण जास्त व नंतर मुलांचें जास्त याचें कारण तारुण्याच्या भरांत आम्लता जास्त असून पुढें कमी होते. या मतप्रणालीचा उलगडा प्रो. उंटरबर्गेन यांनी केला आहे. त्यांचें म्हणणें असें की पुरुषांचे वीर्यजंतु दोन प्रकारचे असतात, एक स्त्रीकारक व दुसरे पुरुषकारक. यांपैकी दुसऱ्या प्रकाराला आम्लता मुळीच मानवत नाही व पहिल्या प्रकाराला अधिक मानवते असें निदर्शनास आलें आहे. संभोगकाळीं स्त्रीबीज पहिल्या प्रकारच्या जंतूंनी फलित झालें तर मुलगी होते आणि दुसऱ्या प्रकाराने झालें तर मुलगा.

योनिमार्गांतील आम्लता कमी करणें फार सोपें आहे. यासाठी 'सोडा बायकार्ब' (खाण्याचा सोडा) फारच उपयुक्त आहे. अडीच–तीन पेले स्वच्छ पाण्यांत चहाचा चमचाभर सोडा घालून या मिश्रणाने योनिमार्ग पिचकारीने धुवावा म्हणजे काम होतें. हें संभोगापूर्वी लागोपाठ तीन दिवस करावें, मात्र

संभोगाची वेळ निदान १२ तासांनंतर ठेवावी. प्रो. उंटरबेर्गेन यांनी वरील प्रयोग ७४ स्त्रियांवर करून पाहिला. या सर्वांना दोनपासून चारपर्यंत पहिल्या सर्व मुलीच झाल्या होत्या व नंतर त्या सर्वांना मुलगेच झाले. याविषयीं अधिक गणितागत माहिती मिळवणें व अनुभवसिद्ध प्रमाणें जमा करणें उपयुक्त होणार नाही काय ? आपला, **रा. वि. सोवनी**, शिकंदराबाद.

उ. वरील माहिती या मासिकांत पूर्वींच येऊन गेलेली आहे ( जानेवारी १९३५ चा अंक पहा ). परंतु कित्येक वाचकांस ती नवीन असेल म्हणून आपल्या पत्रास स्थळ दिलें आहे. **सं.**

३

दोन महिन्यांपूर्वी मी **समाजस्वास्थ्य** मासिक सुरू केलें आहे, तें यापुढे पाठवूं नये. वर्गणी परत नको आहे, पण आमचे ' मिस्टर ' अंक न वाचूं देतां चुलींत घालतात. म्हणून फुकट जाण्यापेक्षा तुम्हाला दुसरीकडे विकतां तरी येअील, अेवढ्याकरतां कळवीत आहें. मला वाटलें संततिनियमनाचीं साधनें वापरलेलीं चालतात, तेव्हां अितके सनातनी नसतील, पण दहा वर्षांच्या सहवासानें सुद्धां स्वभाव ओळखतां येत नाहीत हेंच खरें. नाहीतर तुम्हाला निष्कारण तसदी देण्याची पाळी आली नसती. जास्त काय लिहूं ?...

४

पोस्टांत अंक चोरीस गेल्यामुळे आपणास पुनः पाठवावे लागतात, तरी यास कायदेशीर अिलाज आहे किंवा नाही ?

आपला, **दत्तात्रय शिवराम चिखले.**

उ. याला कायदेशीर अिलाज नाही. पोस्टांतले चोर आपला चोरीचा हक्कच समजतात, आणि पोस्टांत टाकल्याबद्दल पावती घेऊन ठेवली तरीदेखील अंक चोरीस जातात, आणि तक्रार केल्यास ' तपास लागत नाही ' असें ठराविक उत्तर येतें. रजिस्टर केल्याशिवाय टपालखात्यावर कायदेशीर जबाबदारी येत नाही. **सं.**

५.

आपल्या जुलैच्या अंकांत एका वाचकाने मोसंब्यांतून रक्त काढण्याचा जो चमत्कार वर्णिला आहे, तो दाखवण्याची रीत पुढीलप्रमाणें आहे. जासवंदीचें फूल चाकूचे पात्यास वा सुरीस जोराने चोळावें, म्हणजे त्याचा निळसर रंग पात्यास लागतो, पण तो दिसून येत नाही. या पात्याने लिंबू वा मोसंबें कापलें म्हणजे फळाच्या आंबट रसास तांबडा रंग येतो. याचें कारण रसायनशास्त्रांत असें सांपडतें की वनस्पतिजन्य निळया रंगास आम्ल लागलें की निळया रंगाचें तांबड्या रंगांत रूपांतर होतें......मूठ मारून वा मंत्राने शत्रूचा नाश करण्याची विद्या जवळ असूनहि हिंदूंना आपल्या शत्रूंपासून आपलें रक्षण करतां येत नाही, असें सातआठशें वर्षांचा अितिहास सांगत असतांही लोकांचा या भ्रमांवर विश्वास असावा ही अत्यंत शोचनीय गोष्ट होय. रा. ज. गोखले.

---

# शारदेचें पत्र

हर्षे-पानसे विवाहाच्या बाबतींत 'महाराष्ट्र'च्या जुलैच्या अंकांत संपादकांनी आणखी तारे तोडले आहेत. डॉ. अिरावती कर्वे पुण्यास भरलेल्या सभेंत त्यांच्या विरुद्ध बोलल्या म्हणून चिडून त्यांनी अिरावतीबाअींना असा सवाल केला आहे की त्या स्वतः पानसेबाअींना सवत करून घेण्यास तयार होत्या का ? हा प्रश्न किती मूर्खपणाचा आहे याची त्यांना जाणीव दिसत नाही. एकतर ते गृहीत धरतात की पानसेबाअी कोणाशींही लग्न करण्यास तयार होत्या. हा एक मूर्खपणा. दुसरा असा की जोंपर्यंत अिरावतीबाअींवर अशा प्रकारचा प्रसंग आलेला नाही, तोंपर्यंत या प्रश्नाला त्यांनी कांहीही उत्तर दिलें तरी त्याला बिलकुल महत्व नाही, आणि संपादकांनी विचारलेल्या प्रश्नाला तर त्याहीपेक्षा नाही, कारण तसा प्रसंग संपादकांच्या प्रयत्नानेही उत्पन्न होणें संभवनीय नाही. हा केवळ अिरावतीबाअींवर वैयक्तिक हल्ला आहे, कारण संपादकमहाशय लगेच पुढें लिहितात, 'अहो अिरावतीबाअी ! आपण कुंकूं कांहो लावीत नाही ? तुमचें

पांढरें फटफटीत कपाळ रस्त्याने जातांना पाहिल्याबरोबर...मन चरकल्याशिवाय रहात नाही.' या नसत्या उठाठेवी यांना कोणी सांगितल्या आहेत? दुर्दैवाने एखाद्या मुलीवर या संपादकांशीं लग्न करण्याचा प्रसंग आलाच, तर तिने कुंकू लावलेंच पाहिजे अशी अट त्यांनी खुशाल घालावी.

मला अशी शंका येते की त्यांचें स्वतःचें लग्न होत नसल्यामुळेच ते दोन बायका करणाऱ्या पुरुषांवर अितके चिडले असावेत, पण मला नाही वाटत की अशीं लग्नें करणाऱ्या स्त्रियांपैकी अेखादी तरी असल्या कोत्या मनाच्या संपादकाशीं लग्न करायला तयार झाली असती! मग हे उगाच शंख कां करतात? जगांत अजून बायका पुष्कळ आहेत, संपल्या नाहीत. त्यांची लायकी असेल तर त्यांनाही अेखादी मिळूं शकेल, कोणी सांगावें? पण लोकांना शिव्या देऊन मात्र ही लायकी उत्पन्न होणार नाही.

कुंकू न लावलेली बायको पाहिली की यांचें मन चरकतें, पण हल्ली पुष्कळ पुरुष मिशा काढतात, त्यांना पाहिल्याबरोबर त्यांचे आअीबाप मेले असतील या विचाराने श्री. अंबिक्यांची काय स्थिति होत असेल? संपादकांचें मन अितकें हळुवार असून चालणार नाही, आणि जगांत काय चाललें आहे याचेंही थोडेंसें ज्ञान संपादकांना असलें तर कांही बिघडणार नाही. या संपादकांना तारतम्य बिलकुल नाही. 'अेका ब्राह्मणाच्या मुलीला ब्राह्मणेतर कनिष्ठ जातींतील माणसाशीं लग्न करायला अिरावतीबाअी सांगत होत्या' याविषयी ते लिहितात, 'ज्य कारणाकरतां पानसेबाअींचा निषेध करण्यांत आला आहे, तत्समच हें कृत्य आहे.' संपादकांनी हा लेख लिहिण्यापूर्वी अक्कल गुंडाळून ठेवली होती म्हणावें, तर कदाचित् कोणी म्हणेल की अेखादी वस्तु गुंडाळून ठेवायला ती जवळ असावी लागते! पानसेबाअींचें लग्न हिंदु धर्माला पूर्णपणें संमत आहे, त्याचाही हे निषेध करतात, आणि प्रतिलोम विवाह धर्मसंमत नाही, त्याचाही निषेध करतात, आणि हीं उदाहरणें सारखींच आहेत असें मानतात! अशा बरळण्याला कोण महत्व देअील?

नंतर मिरतच्या श्री. गीता साने या विवाहित असूनही नवऱ्याचें नांव न लावतां पूर्वीचेंच लावतात, त्याचाही उल्लेख करून ते म्हणतात, ‘ अशा रीतीने महाराष्ट्रीय सुशिक्षित कुटुंबांतील स्त्रियांमधे नवीन रूढि पडत आहे, त्याचा समाजाने अवश्य विचार करावा.’ म्हणजे सुशिक्षित स्त्रियांनी काय करावें, हें श्री. अंबिक्यांसारख्या अशिक्षित लोकांनी ठरवायचें ! आणि सुशिक्षित लोक त्यांच्या मताला भीक घालतील अशी त्यांची कल्पना आहे. जेव्हां एखाद्या स्त्रीचें नांव लग्नापूर्वीच प्रसिद्ध असेल, तेव्हां ती आपलें नांव लग्नानंतरही कायम ठेवते, कारण त्या नांवाने लोक तिला ओळखीत असतात. आणि यांत कांही गैर आहे असें मला वाटत नाही. कधीकधी याउलटही प्रकार होतात. कॉलेत् विली नांवाच्या प्रसिद्ध फ्रेंच लेखिकेचें जेव्हां सोडलग्न झालें, तेव्हां तिच्या विनंतीवरून कोर्टाने तिला नंतरही नवऱ्याचें नांव लावण्याची परवानगी दिली, कारण त्या नांवाने ती प्रसिद्ध झाली होती. अर्थात् सर्वच लेखिका असें करतात असें नाही पण त्यामुळे लोकांचा घोटाळा होतो. लोकांचा घोटाळा होऊं नये ह्याच व्यक्तींना, किंवा कशालाही नांव देण्याचा उद्देश असतो. एरवीं टेबलाला खुर्ची म्हटलें तरी काय बिघडणार आहे ? पण लोकांना समजणार नाही. शिवाय या खाजगी गोष्टी आहेत. यांत समाजाने लक्ष घालण्यासारखें कांही आहे असें मला तर वाटत नाही.

पुढें हे विद्वान संपादक एक नवीन युक्ति सुचवतात. मागच्या अंकांत त्यांनी लिहिलें होतें की मुलीचें लग्न चोविसाव्या वर्षांपुढें होतां नये असा कायदा करावा. पण ही मर्यादा फार वाटल्यामुळे या अंकांत ते म्हणतात, ‘ अेक तर वीस वर्षांच्या पुढें कोणत्याही कारणाने मुलींची विवाहमर्यादा वाढवतां कामा नये. विशेष तीव्र बुद्धिमत्ता असल्याशिवाय मॅट्रिकपेक्षा अधिक शिक्षणच मुलींना देऊं नये. ’ हे संपादक स्वत: मॅट्रिकपर्यंत देखील शिकलेले नाहीत, तेव्हां त्यांना मॅट्रिक म्हणजे अगदी डोक्यावरून पाणी गेल्यासारखें वाटल्यास नवल नाही. पण सुदैवाने सर्वच अशिक्षित लोक यांच्या अितक्या कोत्या मनाचे नसतात, तेव्हां श्री. अंबिक्यांच्या मतांची मोठीशी भीति

बाळगण्याचें कारण दिसत नाही. पण अशा लेखांनी ' महाराष्ट्र ' मासिक हास्यास्पद होत आहे. हास्यरसाबद्दल माझी तक्रार नाही, पण समंजस लेखक अशी खबरदारी घेतो की हा हास्यरस लेखकाला नकळत उत्पन्न होऊं नये. श्री. अंबिक्यांना तें साधत नाही असें दिसतें.

'कलावर्तमान'च्या आगस्टच्या अंकांत संपादकांनी माझ्या टीकेला उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. ते म्हणतात की मी पेटीवर घेतलेला आक्षेप जुनाच आहे आणि तो जर खरा असता तर ' अबदुल करीम अथवा फैयाजखां यांच्यासारखे संगीतज्ञ मूर्ख लोकांच्या आग्रहासाठीं पेटीचा स्वीकार करणें कधींतरी शक्य असेल काय ? ' हा प्रश्न विचारणाराला त्यांतली किती माहिती आहे हें उघडच दिसतें. पुण्यांतच अेकदां अबदुल करीमखांचा जलसा चालू असतां श्रोत्यांपैकीं अेकाने त्यांना पेटी बंद करायला सांगितली, तेव्हां खांसाहेब म्हणाले, ' आपण पेटी बंद करायला सांगतां हें ऐकून मला फार आनंद झाला. मला पेटी पसंत नाही.' असें म्हणून त्यांनी ती बंद केली. मुंबईत अेकदां असाच प्रसंग आला असतां त्यांनीं पुनः आपलें मत तसेंच सांगितलें, परंतु पेटी तशीच चालू ठेवली, कारण लोकांना ती पाहिजे असते. याचें कारण असें समजलें की मुंबअींतले जलसे एका पेटीबाज संगीतशालेच्या वतीने होत असत, व खांसाहेबांना व्यावहारिक बाजू संभाळतां येत नसल्याने त्यांना त्यांचें ऐकावें लागे. पेटींत फक्त बाराच सूर असतात इतकेंच नव्हे तर तेही चुकीचे असतात. या चुकीच्या स्वरांची साथ हिंदुस्थानी संगीताला शोभते किंवा चालते, असें म्हणणारांना संगीत कळत नाहीं असेंच मी म्हणेन. फैयाजखां यासंबंधी काय म्हणतात हें मला माहीत नाही, पण अबदुल करीमखां हे आपल्या स्वतःच्या शाळेंत कोणालाही पेटीवर गायला शिकवीत नसत, हें त्यांचा कोणताही सच्छिष्य सांगेल अशी माझी खात्री आहे.

तुझी **शारदा**